## - प्रकरण ३ -

### हुकुमतपन्हा रामचंद्रपंत

रामचंद्रपंत शिवाजी महाराजांच्या कालापासून मराठयांच्या इतिहासात आपल्या सामर्थ्यानुसार जी कामगिरी लाभेल ती समर्पणाने पार पाडित होते. वेळप्रसंगी पदाच्या पेक्षा, ते कर्तव्याला जास्त महत्त्व देत होते. म्हणूनच शिवाजी महाराजांनी त्यांचे अमात्यपद काढून रघुनाथपंत हणमंते[१] यांच्याकडे दिल्यानंतर कोणतेही महत्त्वाचे पद मिळाले नसतानाही रामचंद्रपंताने मराठा राज्याची सेवा अखंडितपणे चालू ठेवली होती. पुढे संभाजीच्या कालातही रामचंद्रपंताला सचीवपद कायमपणे भोगता आले नाही.[२] तरीही तो स्वामीनिष्ठ राहिला. छ. संभाजी यांचा अंत मराठयांच्यातील फितुरीमुळे झाला. दिनांक १ फेब्रुवारी १६८९ रोजी संगमेश्वर येथे संभाजी राजाना औरंगजेबाच्या करवी फितुरीने पकडण्यात आले.[3] बेंद्रे यांच्या मताप्रमाणे रामचंद्रपंत त्यावेळी संभाजीच्या विरूद्ध गटामध्ये होते. पण त्या गटातील संभाजीचा सावत्र भाऊ व आई सोयराबाई यांनी व पंतानी संभाजीचा द्रोह केला, असे म्हणत नाहीत. संभाजीचा विश्वासघात मराठी माणसानीच कसा केला, हे दाखविताना बेंद्रे यानी इंग्रजी कागदपत्राचा उपयोग केलेला आहे. त्यानुसार त्यानी मार्टिन नावाच्या गृहस्थाच्या एका नोंदीचा हवाला दिला आहे. त्या नोंदीत म्हटले आहे--

"ज्या ब्राम्हण कारभाऱ्यांनी संभाजीचा विश्वासघात केला त्यांनीच राजारामाचा पुरस्कार केला. संभाजीच्या पुत्रास गादीवर बसविले तर तो पुढे वयात आल्यावर आपला सूड घेईल या भीतीने कारभाऱ्यांनी ही कारवाई केली.

---

१. अ. Takakhav, N.S., Opt. cit., pp. 425 - 426.
   ब. केळूसकर, कृ.अ., उपरोक्त., पृ. ४३०.
२. बेंद्रेसंभाजी., पृ. १२९.
३. अ. Joshi, P.S., Op. cit., p. 248.
   ब. बेंद्रेराजाराम., पृ. ३०.

तथापि, शाहूच्या पक्षा उचलून धरणारे काही लोक आहेतच."[४] पी.एस्. जोशी यानी आपल्या "छत्रपती संभाजी" या इंग्रजीमध्ये लिहिलेल्या पीएच्.डी. प्रबंधात मात्र, संभाजीचे विश्वासघात करणारे फितूर लोक किंवा संभाजीच्या विरोधी गटातील लोकाची नावे स्पष्ट केली नाहीत. ऐवढे मात्र खरे की औरंगजेबाने संभाजीला पकडण्यासाठी सर्व प्रकारचे उपाय योजले होते आणि त्यातूनच संभाजी पकडला गेला होता. संभाजी ज्या दिवशी पकडला गेला त्याच दिवशी राजाराम महाराजाला ज्या रायगडावर नजरकैदेत ठेवण्यात आलेले होते, तेथे संभाजीच्या अटकेची बातमी पोचली होती.[५] संभाजीला दिनांक ११ मार्च १६८९ मध्ये औरंगजेबाने[६] शिरच्छेद करुन ठार मारण्यात यश मिळविले.[७]

संभाजी महाराजांना औरंगजेबाने पकडल्यावर त्याची सुटका होणे अशक्य आहे, असे वाटताच जेधे शकावलीतील नोंदी प्रमाणे-- "रायगडचा किल्लेदार चांगोजी काटकर व यसाजी कंक याणी ९ फेब्रुवारी रोजी राजारामास अटकेतानाहून काढून १२ फेब्रुवारी रोजी मंचकी बैसविले. मानाजी मोरे व वरकड सरकारकून धरिले होते ते सोडिले. ज्याचे कार्यभाग त्याजी देवून राजाराम राज्य करु लागले."[८] अशा प्रकारे राजाराम महाराज सत्तेवर आले. या राजाराम महाराजांच्या पक्षामध्ये रामचंद्रपंत होते. त्याना राजारामाने शंकरजी नारायणाचे सचीव पद काढून दिले.[९] बेंद्रे यांच्या मताप्रमाणे छ. शिवाजी व संभाजी यांच्या काळात रामचंद्रपंताला नाकर्तेपणामुळे आपले अधिकार गमवावे लागले होते.[१०] पण राजारामाच्या काळात मात्र रामचंद्रपंतास जो अधिकार मिळाला होता तो त्याने

---

४. बेंद्रे राजाराम., पृ.३०-३१.
५. गर्गे, स.मा., उपरोक्त., पृ. ३०.
६. पगडी, सेतुमाधवराव., संपा. मोगल आणि मराठे (मोगलेन सभ्मेनाकृत तारिखे दिल्कुशा), पुणे, १९६३, पृ. १००.
७. बेंद्रे संभाजी., पृ. ४९७.
८. उपरोक्त.
९. बेंद्रे राजाराम., पृ. ३१.
१०. उपरोक्त.

शोकपर्यंत टिकविलेला आहे. अर्थात त्यावेळी किंवा त्यापूर्वी रामचंद्रपंताच्या वागण्यावरून बेंद्रे यानी त्याला "देशद्रोही"[११] व "राजद्रोही"[१२] असे जे संबोधले आहे, ते रामचंद्रपंताच्या धरसोडी वृत्तीचा परिणाम म्हणून असावे किंवा पक्का निर्णय घेण्याची कुवत त्यावेळी त्याना आलेली नसावी, म्हणून असावे.

राजाराम महाराजांचे मंचकारोहन १२ फेब्रुवारी १६८९ ला झाले आणि त्यानंतर २५ मार्च १६८९ रोजी मोगल सरदार झुल्फिकारखानाने रायगडाला वेढा घातला. हा वेढा सव्वा सात महिने चालला होता. दरम्यान राजाराम महाराज दिनांक ५ एप्रिल १६८९ रोजी रायगडावरून प्रतापगडाकडे गेले.[१३] रामचंद्रपंत या धामधुमीत महत्त्वाची कामगिरी बजावणारे होते. राजारामाने रायगड सोडताना आपला जनानखाना वगैरे वाडी बरोबर नेलेल्या होत्या आणि त्याना विशाळगड, रांगणा किंवा अशा एखाद्या सुरक्षित ठिकाणी ठेवून मोकळेपणाने मोगलाशी युध्द चालू ठेवावे, अशी पहिली योजना होती. त्यावेळी रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी, शंकराजी मल्हार, सचीव ही मंडळी राजाराम बरोबर होती. मोगलांच्या विरूध्द लढण्यासाठी फौजफाटा गोळा करीत होती. त्यावेळी मोगल सैन्याने कोकणात मराठ्यांचे किल्ले, एका पाठीमागून, एक याप्रमाणे ~~प्रतापगडावर~~ झपाट्याने हस्तगत करायला सुरवात केली होती. राजाराम ज्या प्रतापगडावर होता तिकडेही, ते जायला निघाले होते. म्हणून १६८९ च्या पावसाळ्यातच राजाराम पन्हाळे गडावर गेला. तेथे तो २६ सप्टेंबर १६८९ पर्यंत होता.[१४] राजाराम पन्हाळे गडावर असताना रामचंद्रपंत विशाळगडावर होता.[१५] त्याने मराठी सैन्याची सूत्रे स्वत:कडे घेतलेली होती. राजाराम पन्हाळ्यावर असताना संभाजीला पकडणारा

---

११. उपरोक्त., पृ. ३२.
१२. उपरोक्त.
१३. गर्गे, स.मा., उपरोक्त., पृ. ३१.
१४. सरदेसाई, गो.स., स्थिरबुध्दि राजाराम, ढवळे प्रकाशन, दुरी आवृत्ति, मुंबई, १९७५, पृ. १८.
१५. उपरोक्त., पृ. ६९.

मोगल सरदार शेख निजाम, हा पन्हाळ्गडावर चाल करुन जात होता. तेव्हा ते संकट टाळण्यासाठी रामचंद्रपंताने रायगडचा किल्ला मोगलांच्या उलट लढविणारे संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांना पन्हाळगडच्या किल्ल्यावर चालून येत असलेल्या शेख निजामाच्या उलट लढण्याला पाठविले. रामचंद्रपंताच्या या वेळीच घेतलेल्या योग्य निर्णयामुळे संताजी आणि धनाजी, यांनी शेख निजामाला पन्हाळ्याच्या माचीवर रोखून धरले आणि त्याला पळो की पळो करुन सोडले. म्हणूनच राजाराम महाराजांचा बचाव झाला. आणि तेथून ते सही सलामत बाहेर पडले.[१६]

येथे शकावलीप्रमाणे संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराज जिंजीस पोहचेपर्यंतचा वृत्तांत थोडक्यात दिला असून तो पुढीलप्रमाणे आहे--

"शाके १६११ शुक्ल संवत्सरी चैत्र शुध्द १५ (२५ मार्च १६८९) अवरंगजेबे जुलफ्कारखानास (इतिकदखान) पाठवून रायेगडास वेढा घातला. चैत्र वद्य १० शुक्रवारी (५ एप्रिल १६८९) राजाराम पळोन प्रतापगडास गेले. आश्विन वद्य ८ गुरुवारी (२६ सप्टेंबर १६८९) राजाराम पन्हाळ्यावरुन स्वार होऊन कार्तिक मासी वद्य १३ (३० ऑक्टोबर १६८९) वसुरास आले. तेथून चंदीस आले."[१७] राजाराम महाराजानी जिंजीस प्रयाण करतेवेळी आपल्या पश्चात महाराष्ट्रातील मराठ्यांची सत्ता कशी चालू राहावी, व औरंगजेबाविरुध्दचा लढा कसा यशस्वी-पणे लढला जाईल, या संबंधी जाणकार व अनुभव मराठा सरदारांच्या सल्ल्यानुसार व्यवस्था केलेली होती. त्यांच्या सल्ल्यानेच राजाराम महाराज जिंजीला गेलेले

---

१६. उपरोक्त.

१७. आपटे, द.वि., व टिकेकर, स.म., संपा. शिवचरित्र प्रदीप, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२५, पृ. ३५.

होते. जाताना त्यांनी रामचंद्रपंताच्याकडे "हुकुमतपन्हा" हा किताब देऊन मराठा राज्य चालविण्याचे सर्वाधिकार त्यांच्याकडे दिलेले होते. या संदर्भात मोडक लिहितात-

"सर्व प्रांतात पादशाहाची फौज फिरु लागली, आणि सर्व राज्य मोगलांनी व्यापिले. जिकडे जावें तिकडे लचांड मागे आहेच. दमगाऊन लोक ठेवणें, फौज बंदी करणें व एकादी मसलत करावणे यास अवकाश सांपडेनासा झाला. यास्तव येथून जमाव फोडून चंदीस (जिंजीस) जावें, असा राजाराम महाराजांनी निश्चय केला. आपले कबिले (स्त्रिया) विशालगडीं ठेवून व रामचंद्र निळकंठ (बावडेकर) यास हुकुमतपन्हा हा किताब देऊन त्यांजकडे इकडील प्रांताचा व घाटमाथ्याचा बंदोबस्त सोपवून, राजाराम महाराज कांही मुत्सद्दी सरदारांस घेऊन जंगम, लिंगाईत, कापडी यांच्या वेषानें चंदीस गेले."[१८]

मोडकांनी, हे जे काही सांगितले आहे, ते पुराव्याच्या आधारावरच सांगितलेले आहे. परंतु त्यानी स्पष्टपणे पुरावा दिलेला नाही. तथापि केशव पंडितकृत "राजाराम चरितम्" या संस्कृत ग्रंथामध्ये याविषयी स्पष्टपणे माहिती दिलेली आहे.[१९] राजाराम महाराज पन्हाळगडावर सामान्यत: तीन महिने अडकून पडले होते. ३० जून[२०] १६८९ ते २६ सप्टेंबर[२१] १६८९ पर्यंत या काळात मोगलांनी मराठ्यांना अगदी सतावून सोडले होते. संभाजीपुत्र शाहू तर त्यांच्या कैदेतच होता. त्यामुळे मराठा राज्य आपण जिंकले आहे, अशी त्यांची समजूत होऊ लागली असण्याची शक्यता होती. फक्त त्याकेळी प्रश्न होता, राजारामाला सत्तेवर

---

१८. मोडक, बा.प्र., कोल्हापूर व कर्नाटक प्रांतांतील राज्य व संस्थाने यांचा इतिहास, उत्तरार्ध भाग १, कोल्हापूर राज्याचा इतिहास, पुणे, दुसरी आवृत्ति, १९२५, पृ. १४-१५.

१९. वेंद्रे, वा.सी., संपा. राजाराम चरितम अथवा जिंजीचा प्रवास (केशव प्रडितकृत), पुणे, १९३१, सर्ग ४था. श्लोक ११-१२, पृ. ६६-६७.

२०. गर्गे, स.मा. व संपा. कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास, पुणे, १९७? वटींकर श.ह.) पृ. ३०.

२१. सगोसराजाराम, पृ. १९.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

येऊ न देता संपविण्याचा, किंवा पकडून मोगलांच्या तुरुंगात डांबण्याचा. मोगलांच्या या धोरणाचा मराठा सरदारांनी केव्हाच अर्थ समजून घेतला. म्हणून छत्रपती पदाच्या जागेवरून हुकुम सोडणारा व मार्गदर्शन करणारा त्यांचा मानबिंदू, असा राजाराम छत्रपती, याचे जीवन महाराष्ट्रात धोक्याचे आहे, हे ओळखून त्यांनी त्यांची रवानगी सुरक्षित ठिकाणी करण्याचे ठरविले. त्यासाठी महाराष्ट्रापासून दक्षिणेकडे ६०० मैल[२२] दूर असलेल्या, पण मराठ्यांच्या ताब्यातील जिंजी येथे त्याला गुप्तपणे पाठविण्याचा निर्णय घेतला. राजाराम जिंजीला गेल्यावर त्याच्या पश्चात मराठा राज्य चालू ठेवून मोगलांच्या विरुध्दचा जीवन मरणाच्या लढा, संघर्ष चालवून मराठा राज्य, कसे निभवावयाचे, याची जबाबदारी राजारामाच्या सल्ल्याने मराठ्यांच्यामध्ये वाटून देण्यात आली होती. रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, परशुराम त्र्यंबक आणि इतर मान्यवरांनी आपआपसातील मतभेद मिटवून टाकून स्वराज्याच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली होती. त्यामुळे त्या सर्वांनी राजारामा-समोर घेतलेल्या निर्णयांप्रमाणे वागून काम करण्याचे मान्य केले होते. त्यानुसार, मराठा राज्याचे दोन भाग केलेले होते. आणि शंकराजी नारायणाकडे कोरी-गंडासभोतालचा भाग सोपवला तर रामचंद्र पंताकडे बाकीचा राहिलेला प्रदेश दिला होता.[२२] मात्र त्यावेळी शंकराजी नारायण व रामचंद्रपंत याना अनुक्रमे "राजाज्ञा"[२३] व "हुकूमतपन्हा"[२४] हया ज्या पदव्या किंवा अधिकार दिले होते, त्यांचा विचार करता रामचंद्रपंताचा अधिकार शंकराजी नारायण पेक्षा जास्त होता.

---

२२. अ) बेंद्रे राजाराम., पृ. ६८.

 ब) बेंद्रे राजा चरितम्., पृ. ६६-६७.

२३. गोसराजाराम., पृ. ३६.

२४. उपरोक्त.

रामचंद्रपंताच्याकडे राजाराम महाराजानी कोणता प्रदेश दिला होता व कोणते अधिकार दिले होते, यासंबंधी तथा शंकराजी नारायण याना सचिव पद कसे दिले होते याविषयी रामचंद्रपंतानी राजाराम महाराजांना दिनांक १३ ऑक्टोबर १६९० रोजी एका पत्राद्वारे जी माहिती कळविली होती, तिच्यावरून खुलासा होत आहे. त्या पत्रातील मजकूर असा--

"शंकराजीची या वेळेची कामगिरी रामचंद्रपंतानें जिंजीस राजारामाकडे लिहून कळविली तिचा उल्लेख आहे तो असा, 'शेख निजामानें संगमेश्वरी ठाणें घातलें व सर्जाखान साता-यास वेढा घालून बैसला, त्यांसी युध्दप्रसंग करून शंकराजीपंतानीं गनीम पराभवातें पावविला'. या कामगिरीबद्दल राजारामाने शंकराजीस सचीवपद दिले, त्यावेळीं त्याने आपली हकीकत लिहून कळविली ती अशी-- 'स्वामींच्या पुण्य प्रतापें करून देश दुर्ग काबीज होतील तेथेपर्यंत स्वामीनीं राज्यभार आमच्या स्वाधीन केलाच आहे. सांप्रत स्वामींनीं आम्हास गुरनिशीचा कार्यभाग सांगितला."[२५]

पुढे त्याच वर्षाच्या आणखी एका पत्रात रामचंद्रपंतास क-हाड्यापासून पलीकडे वरघाट गोकर्णपर्यंतची कामगिरी सोपविली व त्यांच्याकडे संताजी घोरपडे दिले, तर शंकराजी नारायणाकडे रायगड्यापासून कोकणपट्टी स्वाधीन केली आणि धनाजी जाधव सुपूर्द केले, अशी माहिती आहे.[२६] राजाराम महाराजांनी रामचंद्रपंत याना "हुकूमतपन्हा" म्हणजे छत्रपतीच्या गैरहजरीत किंवा छत्रपतीच्या आदेशाने हुकूम चालविणारा, असा अधिकार दिलेला होता. तसेच त्याच्या हाताखाली संताजी, धनाजी व शंकराजी आणि घोडके सेनापती

---

२५. उपरोक्त.

२६. अ) उपरोक्त.

ब) आपटे, द.वि., व ओतुरकर रा.वि.) संपा. महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, अनाथ विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे, १९४१, पृ. ५६.

त्याचप्रमाणे पायदळाचे सेनापती दिले होते.[२७] रामचंद्रपंतास हा जो अधिकार दिला होता तो, व त्याच्या हाताखाली जे प्रमुख लोक देण्यात आले होते, त्यावरून हे स्पष्ट होते की राजाराम महाराजाच्या गैरहजरीत मोगलांच्या उलट संघर्ष चालू असताना, तोच सर्वाधिकारी होता.

१. हुकूमतपन्हा म्हणून पंताचे कार्य:

राजाराम महाराज यांना गुप्तपणे जिंजीला पाठविण्यात आले. ते तेथे पोहचल्यावर त्यांचा कबिला जिंजीस पाठवावयाचा होता. या संबंधी मल्हार रामराव चिटणीस यानी आपल्या बखरीत जी माहिती दिली आहे ती अशी--

"तेव्हां बहुत विचार दुर्घट प्राप्त झाला. सहा चार महिने दम खाऊन फौज मसलत करावत नाहीं. एखादे किलियावर राहून किल्ला भांडवून दम खावा म्हणतांही किल्लेबंद झाले असतां परिणाम नाहीं. एखादे ठायीं बाहेर असतां दगा झाला (तर) तेंही ठीक नाहीं. त्याअर्थी कबिले एकादे किल्लयावरी ठेऊन जमाव येथून फोडावा. जिकडील तिकडे वारापाणी करून गेले, फुटले, एसें करून सर्वांनीं ज्यांस जसें करेल तसे दाहापांच, एक्टेदुक्टे एसें करून व मोगलाईत रोजगारास जातों एसें करून, पागा घोडे जो निभावेल तें करून, चंदीस येऊन पोहोंचावे. आपण सडे होऊन पांच पंचवीस मुत्सद्दी सरदार ऐसे वेष बदलून, जंगम, लिंगाईत कापडी यांचे वेष घेऊन चंदीस जाऊन पोंचावें. कबिल्यापाशीं रामचंद्र नीलकंठ यांनी या प्रांती राहून, आम्ही तिकडे गेलियावरि कबिलेही युक्तीने काढून पोहोंचवावे, रायगडचीही बातमी बरचेवर राखून, तीही काढून आणून तिकडे युक्तीनें शिवाजी-राजे कबिले पोहोंचतरो करून, आपण यात प्रांती राहून संस्थानें जतन होतील तीं करून पुढे जसा विचार सुचेल तसें करावें, म्हणोन सांगोन ठेविले."[२८]

२७. केंद्रे राजाराम., पृ. ६४.

२८. केरवाळकर, र.चि., उपरोक्त., पृ. १०-११.

चिटणीसांच्या बखरीतील हा मजकूर मराठा इतिहासकारांनीमान्य केलेला आहे. तेव्हा या मजकूराच्या आधारे रामचंद्रपंताकडे जी अत्यंत महत्त्वाची कामगिरी सोपवण्यात आली होती, ती म्हणजे छत्रपतीच्या घराण्यातील बायकामुलांचे संरक्षण करण्याची. अर्थात त्याकाळी मराठयांचा सर्व प्रदेश मोगल सैन्याने व्यापला असल्यामुळे रामचंद्रपंतावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत कठीण होती असेच म्हणावे लागेल.

संभाजी राजे यांचा ज्यावेळी मोगलांनी वध केला, त्यावेळी मोगल सैन्य मराठा राज्य मोडून काढण्याच्या तयारीला लागलेले होते. राजाराम त्यावेळी रायगडावर होता. त्या रायगडालाही त्यांनी वेढा दिलेला होता. तेथून तो कसातरी सुटून पन्हाळगडावर आला. पण तेथेही मोगल सरदार निजाम याच्या नेतृत्वाखाली येऊन पोहोचले होते. म्हणजे रायगडाकडे झुल्फिकारखान व पन्हाळ-गडाकडे शेख निजाम, असे दोन जबरदस्त मोगल सेनापती मराठयांच्या विरुध्द *लढत* होते. त्यातूनही मार्ग काढून राजारामाला जिंजीस पाठविण्यात आले. त्यावेळी-ही मोगल सैन्याने त्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. राजाराम अशा त-हेने जिंजीला पोहोचल्यावर, महाराष्ट्रामध्ये मोगल सैन्याला यशस्वीपणे तोंड कसे द्यावयाचे, असा महत्त्वाचा प्रश्न होता. त्यासंबंधी राजाराम जिंजीला जाताना जे "राजमंडळ"[२९] निर्माण करण्यात आले होते, त्या राजमंडळाच्या धोरणानुसार मराठा राज्य वाचविण्याची शिकस्त होणार होती. या राजमंडळामध्ये शंकराजी नारायण याना सचिवपद दिलेले होते. आणि त्यांच्याकडे "सातारा ते मुलूख काबीज होईल तो देश"[३०]

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

२९. सबनीस, के.गो., <u>उपरोक्त.</u>, पृ. ३४.

३०. आपटे, द.वि. व ओतुरकर, रा.वि. } *संपा.* ..., ..., उपरोक्त., पृ. ६६.

सोपविण्यात आला होता. या प्रदेशामध्ये त्यानी राहून राज्याचे रक्षण करावयाचे होते. आणि रामचंद्रपंताकडे "बांधारीचे किल्ले विशाळगड, रांगणा, गगनगडबावडा वगैरे बळावून, जवामर्दीनें खालीं प्रांतांत स्वारिया करून, मारून नेऊन बेजमी करावी, कोंकण प्रांतही राखावा, त्यांचे कोणी आल्यास लढावें, पुन: जकील मुलूख राखून असावें. ऐसें करूं लागले. राहिले."[३१] अशा प्रकारे रामचंद्रपंतानी स्वत:वर फार मोठी जबाबदारी स्वीकारलेली होती.

रामचंद्रपंताने छ. संभाजी यांची पत्नी येसूबाई व त्यावेळचे कर्तबगार मराठा सरदार व मानकरी यांच्या सल्ल्याने राजाराम महाराजांना मोगलाच्या तावडीतून सुरक्षित ठेवण्यासाठी जिंजीला पाठविण्यात पुढाकार घेतला होता.[३२] तसेच राय-गडास पडलेला मोगल सैन्याचा वेढा मोडून काढण्यासाठी धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांच्या हमतीला लष्कर देऊन तिकडे पाठवले होते. मराठा सरदारांनी कोणी कोठे, व कशी कामे करावी, याची सर्व व्यवस्था रामचंद्रपंताच्याच मार्गदर्शनाखाली झालेली होती. तो काळ आणिबाणीचा असल्यामुळे, अनेकवेळा निर्णयातही बदल करावे लागत असत. अशा कठीण कालामध्ये रामचंद्रपंतावर मराठा राज्याला नेतृत्व देण्याची व मार्गदर्शन करण्याची जबाबदारी पार पाडावी लागली होती. आणि ही जबाबदारी पार पाडित असताना आपआपसातील ऐक्य सुध्दा टिकवावयाचे होते.

राजाराम जिंजीला सामान्यत: नोव्हेंबर १६८९ मध्ये पोहचला आहे, असे वा.सी. बेंद्रे यांचे सुध्दा मत आहे. पण निश्चित तारीख उपलब्ध झालेली नाही.[३३] मात्र जयसिंगराव पवारानी राजाराम जिंजीला पोहचल्याची तारीख १ नोव्हेंबर

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

३१. हेरवाडकर, र.वि., उपरोक्त., पृ. १८.

३२. मोरे, रा.म., उपरोक्त., पृ. ३४.

३३. बेंद्रे राजाराम., पृ. ७१.

१६८९ अशी दिली आहे. पण त्या संबंधीचा पुरावा दिलेला नाही.[३४] परंतु प्रसिध्द अशा जेधे शकावलीच्या वरून, असे दिसते की राजाराम महाराज २८ ऑक्टोबर १६८९ ला वेलोरला पोहोचले[३५] व तेथून पुढे सरदेसाईच्या मताप्रमाणे ते तारीख १५ नोव्हेंबर १६८९ रोजी जिंजीला पोहोचले.[३६] तर राजाराम ज्यावेळी जिंजीच्या आसपास होते तेव्हा रायगडचा लढा चालू होता. रायगड ता. ३ नोव्हेंबर १६८९ रोजी मोगलांच्या ताब्यात दिला[३७] आणि येसूबाई व तिचा मुलगा शाहू हे सुध्दा मोगलांच्या ताब्यात गेले.[३८] त्यानंतर मराठा राज्याचे रक्षण कसे करावे, हाच सर्वात महत्त्वाचा प्रश्न, सर्व कारभारी आणि सरदार यांच्यापुढे होता. अशा वेळी रामचंद्रपंतानी प्रसंगावधान राखून मोगलांच्या विरुध्दचा मराठ्यांचा लढा खंबीरपणे चालू ठेवण्याची सर्वांना प्रेरणा दिली.

परंतु राजाराम महाराज जिंजीला गेल्यावर रामचंद्रपंतानी पन्हाळा व पावनगड हे दोनी किल्ले मोगलाच्या उलट लढवित असताना सोडून दिले अशी माहिती चिटणीस बखरीच्या कोल्हापूर आवृत्तीत आल्याचे गा.ही. बेंद्रे सांगतात.[३९] अर्थात पन्हाळा व विशाळगड, हे दोन किल्ले मोगलांच्या उलट लढवत असताना मराठ्यांना सोडून द्यावे लागले होते, ही खरी वस्तुस्थिती आहे. पण पादशाहाकडून निरोप आल्यामुळे रामचंद्रपंतानी ते सोडून दिले, असे जे म्हटले आहे ते योग्य दिसत नाही. पादशाहाकडून रामचंद्रपंताना जो निरोप आला होता त्याचा चिटणीस बखरीत खालीलप्रमाणे उल्लेख आहे--

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

३४. पवार,ज.भा., महाराणी ताराबाई, ताराराणी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, १९७५, पृ. ४२.

३५. आपटे,द.वि. व दिवेकर,स.म. ) संपा. उपरोक्त., पृ. ३५.

३६. सगोसराजाराम., पृ. २५.

३७. आपटे,द.वि., व दिवेकर,स.म., ) उपरोक्त., पृ. ३५.

३८. सगोसराजाराम., पृ. २०-२१.

३९. बेंद्रेराजाराम., पृ. २३२.

"तुमची लढाईची शर्त जाहली, निमकहलाल आहात. तुमच्या धन्याचा तुम्हांस पुस्तपन्हा होत नाही. त्याअर्थी तुम्ही दोनही किल्ले सरकारांत द्यावे. मागाल ते बक्षिस देतो."[४०]

रामचंद्रपंताना पन्हाळा मोगलांच्या ताब्यात द्यावा लागला ही वस्तुस्थिती आहे. पण परिस्थितीच तशी होती. कारण औरंगजेब दक्षिणेत आल्यापासून त्याने त्याचे सर्व सामर्थ्य मराठ्यांच्या विरुध्द वापरायला सुरवात केली होती. परिणामी मराठ्यांना ही आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी औरंगजेबाच्या मोगल सैन्याविरुध्द सतत लढावे लागले होते. अशा अनेक संघर्षा-च्यामुळे संभाजीच्या कारकीर्दीतच मराठ्यांचे फार मोठे नुकसान झालेले होते. खजिना रिकामा होत आला होता. दारुगोळा सुध्दा अगदी कमी प्रमाणातच शिल्लक राहिलेला होता. शिवाय औरंगजेबाच्या भितीने काही अधिकारी व देशमुख मोगलांना जाऊन मिळाले होते. संभाजीच्या वधानंतर ही परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती. अशा गंभीर प्रसंगी पन्हाळगड मराठयांच्यावतीने लढविला जात होता. तो लढविण्याचे काम कागलकर घाटगे यांच्याकडे सोपविले होते. घाटगे यांच्या मदतीलाजाण्याविषयी रामचंद्रपंतानी संताजी घोरपडे यांना सांगितले होते. पण घोरपडे घाटगे यांच्या मदतीला गेलेच नाहीत. तेव्हा किल्ला लढविणे कठीण असल्याने कोणता निर्णय घ्यावा, असा मोठा प्रश्न होता. किल्ल्यापेक्षा आपले सरदार आणि लष्कर मराठ्यांच्यादृष्टीने महत्त्वाचे होते. शिवाजी महाराजांनीसुध्दा तोच पायंडा पाडलेला होता. कारण गेलेला किल्ला सुध्दा परत घेता येणे शक्य होते. म्हणूनच पंतानीसुध्दा पन्हाळा मोगलांच्या ताब्यात देण्यास सांगून सैन्य वाचवावे, असा सल्ला कागलकर घाटगे यांना दिला.[४१] तो

---

४०. हेरवाडकर, र. वि., उपरोक्त., पृ. १५.
४१. गोरे, रा. म., उपरोक्त., पृ. ४०.

किल्ला देण्यामागे कसल्याही प्रकारचा द्रोह किंवा कच्कुवतपणा न नव्हता. बेंद्रे यांनी मात्र रामचंद्रपंताला दोष दिलेला आहे.[४२]

बेंद्रे यांच्या मताप्रमाणे संभाजी महाराजांनी रामचंद्रपंतास प्रथम सचीव पद देऊन नंतर त्याच्या अकार्यक्षमता व गैरवागणूकीवरून दूर केले होते. त्यानंतर ते पद पंताच्या हाताखालचे शंकराजी नारायण यांना दिले होते. आणि राजाराम महाराज जिंजीला गेले तेव्हा ते पद शंकराजी नारायण यांच्याकडून काढून घेऊन रामचंद्रपंतानी आपल्याकडे घेतले. पण ही बाब शंकराजी नारायण यांच्याकडे असलेल्या माके लष्करास मान्य झाली नाही. तेव्हा ते लष्कर पूर्याजी पिसाळाकडे गेले आणि त्यातील कांहीनी मोगल सैन्यात शिरकाव केला. त्यामुळेच मोगल सैन्याचा जोर वाढला होता.[४३] परिणामी मोगलांची सरसी झाली. म्हणून पुन्हा राजाराम महाराजांनी ते पद पंताच्याकडून घेऊन शंकराजी नारायण यांच्याकडे दिले व पंताच्याकडे "फक्त महाराष्ट्रातील राज्यापुरतीच अमात्य पदाची कामगिरी दिली."[४४] बेंद्रे यांचे हे मत सेतु माधवराव पगडी यानी खोडून काढले आहे. त्यांच्या मताप्रमाणे पूर्याजी पिसाळ आणि त्याचे भाऊगोत्री गाके यांचा आणि शंकराजी नारायण यांचा सचीव पदाचा काहीही संबंध नव्हता. आपल्या मतासाठी पगडी यांनी केशव पंडितकृत "राजाराम चरितम्" या संस्कृत ग्रंथातील तत्कालीन परिस्थितीच्या वर्णनाचा आधार घेतला आहे.[४५]

राजाराम जिंजीला गेल्यावर ताराबाई व राजघराण्यातील इतर मंडळी पन्हाळगडावर होती. पन्हाळगड मोगलांच्या ताब्यात गेल्यावर राजारामाच्या पाठीमागे ताराबाईसह त्यांचा कबिला विशाळगड येथे राहू लागला होता. या

---

४२. बेंद्रेराजाराम., पृ. २६२.
४३. उपरोक्त., २६२-२६३.
४४. उपरोक्त., पृ. २६३.
४५. पसेतुहिंस्वमो., पृ. १०९.

विशालगडावर राजारामाच्या पश्चात मराठ्यांची सत्ता चालू ठेवण्यासाठी सामुदायिक स्वरूपाचे एकमंडळ निर्माण केल्याचे दिसते. त्याला काही इतिहासकारांनी राजमंडळ[४६] असे नाव दिले आहे. या मंडळाच्यावतीने महाराष्ट्रात राज्यकारभार चालू होता. पण छत्रपती या नात्याने राजाराम महाराज कर्नाटकातून त्यांना नेमणूका देत होता व कामे सांगत होता. महाराष्ट्रामध्ये रामचंद्रपंताला राज्य चालविण्याचा जो अधिकार दिला होता, तो छत्रपती[४७]पदाच्या बरोबरीचा होता आणि विशालगड हे महाराष्ट्रातील राज्यव्यवस्थेचे मुख्य केंद्र होते.[४८] या विशालगडावर राजारामाची पत्नी ताराबाई ही राजमंडळाला मार्गदर्शन करीत असे. जदुनाथ सरकार यांच्या मताप्रमाणे "ताराबाईने पतीच्या हयातीतच आपला पौरुषी कार्योत्साह आणि बुध्दिमता निदर्शनास आणून दिली होती. त्याच काळात तिने राज्यकारभाराची सूत्रेही हाती घेण्यास प्रारंभ केला होता."[४९] या प्रारंभीच्या काळातच ताराबाईने "हुकूमतपन्हा" रामचंद्रपंत अमात्य यांच्या कार्यातही लक्ष घालण्यास सुरवात केली होती. असे गर्गे यांचे म्हणणे आहे.[५०] पण राजाराम जिंजीला पोहोचला त्यावेळी किंवा त्यापूर्वी, आणि त्यानंतरच्या दोन चार वर्षात ताराबाईने फार महत्त्वाची भूमिका बजावली असेल, असे दिसत नाही. कारण तिचा जन्म सन १६७५ सालचा आहे आणि १६८९ मध्ये ती केवळ चौदा पंधरा वर्षाची आहे. या वयात मराठ्यांचे राजकारण व मराठ्यांच्या शत्रूचे राजकारण, तथा औरंगजेबाचे राजकारण तिला त्या वयात कळावे, इतके सोपे नव्हते. तथापि राजघराण्यातील तीच वयाने जास्त असलेली व्यक्ती असल्याने, "मराठा राजमंडळ" जी मसलत करीत होते, ती रामचंद्रपंताने किंवा त्याच्यासह इतर प्रमुखांनी तिच्यासमोर केली असावी. आणि त्या मसलतीचे बरे वाईट

---

४६. उपरोक्त., पृ. १३३.
४७. भागवत,अ.ना., उपरोक्त., पृ. १०६.
४८. उपरोक्त.
४९. गर्गे,स.मा., उपरोक्त., पृ. ४८.
५०. उपरोक्त., पृ. ४८.

परिणाम निदर्शनास आणून दिले असावेत. तिने त्यावेळी चांगल्या व हिताच्या गोष्टीसाठी समजून घेऊन त्यास तात्काळ मान्यता दिली असावी. म्हणूनच तिच्यापासून सर्वांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळाले होते.[५१] ताराराणीच्या अशा भूमिकेमुळे राजमंडळ योग्य निर्णय घेऊन मोगलांच्या उलट लढत होते. याचा पुरावा म्हणजे सन १६९० मध्ये ताराबाई व राजमंडळ, यानी धर्मदाय इनाम व वतनासंबंधी घेतलेला निर्णय हा होय.[५२]

राजाराम महाराजानी जिंजीला गेल्यावर १० लोकांचे मंत्रिमंडळ नेमलेले होते,[५३] ते असे--

| | |
|---|---|
| १) निळो मोरेश्वर पिंगळे | - पंतप्रधान (पेशवे) |
| २) प्रल्हाद निराजी | - प्रतिनिधी |
| ३) संताजी घोरपडे | - सेनापती |
| ४) रामचंद्रपंत | - हुकूमतपन्हा |
| ५) जनार्दनपंत हणमंते | - अमात्य |
| ६) शंकराजी मल्हार नरगुंदकर | - सचीव |
| ७) श्रीकराचार्य कालगावकर | - पंडितराव |
| ८) रामचंद्र त्रिंबक पुंडे | - मंत्री |
| ९) महादजी गदाधर | - सुमंत |
| १०) बाळाजी सोनदेव | - न्यायाधीश |

"हुकूमतपन्हा" हे पद व अधिकार रामचंद्रपंतासाठी खास बाब म्हणून निर्माण करण्यात आलेचे दिसते. कारण त्यापूर्वी तसे पद मराठा राज्यात निर्माण केलेले

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

५१. Brij, Kishore., Tarabai And Her Times, Asia Publishing House, Bombay, 1963, pp. 32 - 33.

५२. सबनीस, के.गो., उपरोक्त., पृ. ३४-३६.

५३. सगोसराजाराम., पृ.४१.

नव्हते. गर्गे यांच्या मताप्रमाणे "हुकूमतपन्हा" यांचाहुकूम छत्रपतीनी सुध्दा मान्य करावा, असा तो अधिकार होता.[५४] स्वाभाविकच आपल्याया पदाच्या अधिकारात मराठा राज्याच्या हितासाठी रामचंद्रपंतानी डावपेचाचा एक भाग म्हणून पन्हाळा मोगलाना दिलेला होता. पण त्याचा अर्थ असा नव्हे की मोगलांच्या विरूध्दचा संघर्ष रामचंद्रपंतानी थांबविला होता. उलट छत्रपती महाराष्ट्रात नसतानाही पंताच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मोठ्या जिद्दीने औरंगजेबाच्या बरोबर संघर्ष चालू ठेवला होता. या संघर्षाची माहिती विठ्ठल दास नावाच्या कवीने आपल्या एका काव्यात देलेली आहे. त्या काव्यातील कांही ओळी खालीलप्रमाणे रामचंद्रपंताचे वर्णं करतात---

"येतानारामराजा तजुंनी वीभवा तांब्र युध्द प्रसंगे
सेना गेली तीशांगी अवचट उरलो थोडके लोक संगे
धैर्ये वीर्ये प्रतापा धरूनी मनी पाहा राज चंदीस आला
मागे त्या रामचंद्र शीव वरद व्हे येत्न तो मांडीयेला ...२२
लोकांसी सांगे हीत तो अमात्य
संपूर्ण देशासि करा निपात
करूनि येसि उदरासी शांती
ह्या राम फोजा म्हणावा दीगाती"[५५] ...२३

अशा त-हेने राजाराम महाराज जिंजीकडे गेल्यावर महाराष्ट्रात रामचंद्र-पंताच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मोगलांच्या विरूध्द लढा प्रखरपणे चालू ठेवला होता. हा लढा चालू ठेवणे व यशस्वी करणे, ही सर्व जबाबदारी "हुकूमतपन्हा"

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

५४. गर्गे, स.मा., उपरोक्त., पृ. ३४.

५५. पवार, आप्पासाहेब., ताराबाईकालीन कागदपत्रे खंड पहिला, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, १९६९, पृ. ४-५.

या नात्याने पंताच्याकडे होती. तथापि मराठा सरदारांतील सर्वच सरदार पंताच्या मताप्रमाणे वागणारे होते, असे नाही. राजाराम महाराज जिंजीला निघून गेल्यावर मोगल सैन्याने त्यांचा जिंजीपर्यंत पाठलाग केला. महाराज तिकडे गेल्यामुळे अनेक मराठा सरदारांनी महाराष्ट्रात राहून रामचंद्रपंतांच्या नेतृत्वाखाली मोगलांच्या विरुध्दचा जो लढा चालू होता, त्यात सहभागी होण्याऐवजी जिंजीकडे धाव घेतलेली होती. त्यामध्ये संताजी घोरपडे व त्यांचे दोन बंधू हे प्रामुख्याने होते. त्यांनी पंताच्या हुकूमात राहून महाराष्ट्रात काम करावे अशी राजाराम महाराजांची इच्छा होती. पण तसे न करता ते रामचंद्रपंताच्या हुकूम झुगारून गेले होते. म्हणून पंतानी ती सर्व हकीकत राजाराम महाराजाला कळविली. तेव्हा महाराजानी संताजी घोरपडयांचे सेनापतीचे अधिकार काढून घेऊन म्हादजीराव पानसंबळ याना शाके १६१२ म्हणजे सन १६९१ मध्ये सेनापती पद दिले.[५६]

राजारामाच्या पश्चात महाराष्ट्रामध्ये मोगल आणि मराठा सैन्य यांच्या झटापटी सारख्या सुरूच होत्या. मोगल सैन्याला समोरासमोर तोंड देता येणे शक्य नसल्याने, मराठा सैन्य आपल्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणे गनिमी काव्याच्या अवलंब करून मोगल सैन्याला हुसकून लावण्याचा प्रयत्न करीत होते. तारीख २५ मे १६९० मध्ये मोगल सरदार सर्जाखान योने साता-याला वेढा घातला होता. तो वेढा मोडून काढण्यात रामचंद्रपंताचे नेतृत्व यशस्वी झाले. सर्जाखानाचा पाडाव केला व त्याच्याकडून एक लाख रुपये खंडणी घेऊन त्याला सोडून दिले. आणि त्याच लढ्याचा एक भाग म्हणून प्रतापगड व वाई प्रांतातील रोहिडा, राजगड व तोरणा, हे किल्ले सुध्दा मराठ्यांनी घेतले.[५७] त्याकाळी औरंगजेबाच्या दृष्टीने राजारामाला पकडणे महत्वाचे असल्याने, त्यानी झुल्फिकारखान, हा मोगलाचा बलाढ्य

---

५६. हेरवाडकर, र.वि., उपरोक्त राजाराम., पृ. १७.
५७. केळेराजाराम., पृ. ८३.

सेनापती, राजारामाला पकडण्यासाठी जिंजीकडे पाठविला होता. या झुल्फिकारखानाच्या मदतीसाठी पन्हाळगडावरील मोगलांचे सरदार कामबक्ष व शहाजादा आसदखान, यांना झुल्फिकारखानाच्या मदतीसाठी जिंजीकडे पाठविण्यात आले. या परिस्थितीचा फायदा घेऊन मराठयांनी पन्हाळा मोगलांच्याकडून परत घेतला. अर्थात पुन्हा १६९२–९३ मध्ये मोगलांनी पन्हाळा परत घ्यायचा प्रयत्न केला. पण १६९३ च्या ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये रामचंद्रपंत, शंकराजी पंडित, सचिव यांनी धनाजी जाधवाच्या साह्याने पन्हाळ्याला पडलेला वेढा उठवून पन्हाळा आपल्या ताब्यात ठेवला.[५८] या कालामध्ये औरंगजेब बादशाहा, कोरेगाव पासून विजापूर जवळच्या गलगला या ठिकाणापर्यंत गेलेला होता. आणि त्याने त्याचे सर्व सामर्थ्य राजारामाला पकडण्यासाठी केंद्रीत केले होते.[५९]

याच सुमारास मराठ्यांनी वराव प्रांतात, सिद्दी हीलालखान याच्या विरुध्द मोठी मोहिम सुरु केली होती. या मोहिमेत मराठयांची सरशी होणार होती. म्हणून ती थांबवण्यासाठी बादशाहाने लुत्फुल्लाखान या प्रसिध्द सरदाराला सिद्दी हिलालखान याच्या मदतीसाठी पाठविले होते. पण मराठा सरदार संताजी घोरपडे, धनाजी जाधव व मल्लोजी नकले यांनी मोगल सैन्याचा डाव हाणून पाडला. या संबंधी लुत्फुल्लाखानाने बादशाहाला जो वृत्तांत कळविला होता, तो पुढीलप्रमाणे आहे--

"संता आणि धना (संताजी व धनाजी) हे आपल्या काफर सैन्यासहित महसवड भागात पसरले असून त्वरेने त्यांचा मोड करावा, अशा अर्थाचे आपले आज्ञापत्र मिळाले. मी ताबडतोब त्या कामगिरीवर रवाना झालो. मी कसबे

---

५८. उपरोक्त., पृ. ८४.
५९. उपरोक्त., पृ. ८५.

पिलीव, येथे मुक्काम केला. दुस-या दिवशी मी तेथून रवाना झालो. वाटेत डोंगरांतून व द-यांतून शत्रूचे सैनिक पसरले होते. शत्रूपाशी आठ हजार स्वार व अगणित पायदळ असे सैन्य होते. त्या सैन्याने चाल करुन आमच्या सैन्याला चौहूकडून कोंडले. मी आपले सैन्य रचना केली. आमच्या सैन्याबरोबर असलेली सगळी सामग्री मी सैन्याच्या मध्यभागी ठेवली. आमचे सैन्य शत्रूशी लढण्यास सज्ज झाले. युध्दाला सुरवात झाली. युध्द निकाराला येऊ लागले. काफर इफ्के याजपाशी दोन हजारांपेक्षा अधिक कर्नाटकी बंदुकची होते. बंदुका आणि बाण यांच्या वर्षावामुळे प्रलयकालाचा भास झाला. शत्रूचे सैन्य आमच्या सैन्याच्या ज्या बाजूवर चाल करुन येई तिकडे आमचे सैनिक निकाराने प्रतिकार करुन त्याला मागे हटवीत. अशा रीतीने ही लढाई संध्याकाळपर्यंत चालली होती. शेवटी संताजी आणि धनाजी हे पाच हजार निवडक स्वारानिशी आमच्या सैन्यावर चालून आले. पण आमच्या सैन्याने त्यांची तमा बाळगली नाही. आमचे सैन्य पाय मांडून उभे राहिले. शेवटी शत्रूपैकी अनेक माणसे मृत अथवा जखमी झाली. आणि त्यांच्या सैन्याचा पराजय झाला. आमचा मोठाच विजय झाला. या युध्दात शत्रूपैकी जवळजवळ एक हजार माणसे ठार झाली. अनेक माणसे जखमी झाली. आमचे जवळजवळ दोनशे सैनिक ठार झाले. जखमी सैनिकांची संख्या तीनशेच्यावर असावी."[६०]

गो.स. सरदेसाई यांनी इ.स. १६९२ ते १६९७ या काळात महाराष्ट्रामध्ये रामचंद्रपंताच्या मार्गदर्शनाखाली मोगलांच्या उलट जे युध्द चालू होते, त्याची माहिती काही प्रमाणात दिलेली आहे. अर्थात या दरम्यानची सविस्तर माहिती, जेवढ्या प्रमाणात तत्कालीन साधन सामुग्रीच्या आधारावर उपलब्ध व्हावयास हवी

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

६०. पगडी, सेतुमाधवराव., संपा. मोगल-मराठा संघर्ष (फ़ुतुहाते आलमगिरी-लुत्फुल्लावी पत्रे), पुणे, १९६४, पृ. ११३.

होती; तेवढी झालेली दिसत नाही. कारण ख-या अर्थाने, तो काल म्हणजे मराठयांच्या स्वातंत्र्य युध्दाचा महत्त्वाचा कालखंड होता. या कालखंडाची महाराष्ट्रातील लढयांची माहिती सखोल आणि सविस्तर पणे संकलीत करणे महत्त्वाचे आहे. पण तो एक खास वेगळा विषय असल्याने, येथे ऐवढेच पाहावयाचे आहे; की या कालखंडामध्ये रामचंद्रपंतानी "हुकूमतपन्हा" या नात्याने नेमकी कामगिरी कशी बजावली होती.

राजाराम जिंजीला निघून गेल्यावर त्याच्या पाठलागासाठी औरंगजेबाने आपले काही घोडदळ पाठविले होते. तथापि "महाराष्ट्र संपूर्ण काबीज झाल्याशिवाय कर्नाटिकाकडे जावयाचे नाही, हा बादशाहाचा प्रथम विचार होता."[६१] अर्थात बादशाहाचा असा ठाम विचार असला तरी त्याच्या सैन्याने महाराष्ट्र सहजासहजी जिंकावा, इतके काही सोपे नव्हते. बादशाहाचे सैन्य मराठयांना सर्व बाजूनी कोंडित पकडण्याचा प्रयत्न करीत होते. त्यावेळी प्रामुख्याने मराठा फौज विशाळगड, रांगणा व इतर दक्षिण कोकणांतील भागात विखुरलेली होती. रामचंद्रपंतानी या सर्व भागातून मोगलांच्या हल्ल्याविरूध्द जोरदार प्रतिकार केला. मराठा सरदारांना योग्य मार्गदर्शन केले आणि जे सरदार मोठा पराक्रम गाजवितील त्यांना किताब आणि जाहगि-या देण्याची सुरुवात केली. रामचंद्र पंताने मराठा सरदारांना खालील प्रमाणे आदेश व प्रेरणा देण्याची माहिती सरदेसाईनी दिलेली आहे--

"कोकण प्रांत राखावा; शत्रूची वर्दी ठेवून जपून वागावें, असा प्रकार चालला. जे सरदार पराक्रम करितील, व चौथाई सरदेशमुखी वगैरे वसूल करून आणितील, त्यास किताब, जहागिरी वगैरेच्या सनदा देऊन तो खुश ठेवी.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

६१. मराठी रियासत., भाग २, पृ. ६३५.

ते प्रांतात जाऊन पाळेगारीनें मुलूख मारून राहूं लागले. पाळेगारीनें किल्ल्यांचा वगैरे आश्रय करून, झाडींत राहवें, तेथून मुलखांत अंमल बसवावा, घ्यावा, फिरून पळावें, फिरून येऊन प्रदेश काबीज करावा, पथकांतील लोकांची संख्या वाढवावी."[६२] रामचंद्र पंताच्या अशा धोरणामुळे मराठा सैन्याने केवळ मोगलांचे अतिक्रमण थोपवून धरले, असे नाही; तर ते परतवून लावण्यातही काही प्रमाणात यश मिळविले. त्यामुळे मराठा राज्याची वृध्दी होत गेली. मावळ प्रांतातील बाजी सर्जेराव जेधे, पासलकर व देशपांडे हे सरदार, तसेच मुठा खो-यातील आणि इतर भागातील जमीनदार बहुसंख्येने रामचंद्रपंताच्या लष्करात दाखल झाले. त्या सर्वांनी मोगल सैन्यावर हल्ला करून त्यांच्या ताब्यातील अनेक किल्ले, कोट व मुलूख काबीज केले.[६३] या धामधुमीच्या काळात रामचंद्र पंताकडे परशुराम त्र्यंबक या नावाचा एक ब्राम्हण गृहस्थ स्वत:च्या पराक्रमाने मोठया प्रसिध्दीस आला. रामचंद्रपंताकडे त्यानी काही काळ कारकूनी केली होती. त्याने त्याकाळच्या धामधुमीत पन्हाळा, हेरे, भुदरगड, चंदनगड, रांगणा आदी किल्ले घेण्याच्या कामात फार मोठा पराक्रम गाजविला होता.[६४]

पुढे मोगलानी विशाळगडला वेढा दिला असताना, तो वेढा मोडून काढणे अशक्य झाल्याने, रामचंद्र पंतानी विशाळगड सोडला व सातारा येथे राहू लागले. सातारा येथे राहात असताना धनाजी जाधव व संताजी घोरपडे जिंजीहून महाराष्ट्रात परत आले होते. प्रल्हाद निराजी मात्र कर्नाटकात राजारामाजवळ राहिले होते. तेव्हा धनाजी व संताजी यांच्या साहाय्याने रामचंद्र पंताने महाराष्ट्रातील मोगलांच्या विरूध्दचा लढा अधिकच जोरदार केला. सरदेसाई यानी म्हटल्याप्रमाणे रामचंद्रपंताने त्याकेळी सतत जागरूकपणा दाखवून महाराष्ट्राचा बचाव केला.[६५]

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

६२. उपरोक्त., पृ. ६३५.

६३. उपरोक्त.

६४. अ) भागवत, अ.ना., उपरोक्त., पृ. १२५.

ब) सगोसमरि., भाग २, पृ. ६३६.

६५. उपरोक्त., पृ. ६३७.

तथापि रामचंद्रपंत सातारा येथे राहून मराठा राज्याचा कारभार यशस्वीरित्या करतो आहे, हे पाहून औरंगजेब व मोगल सरदार यांना ते पाहावले नाही. आपण महाराष्ट्र सहजासहजी जिंकू, असे मोगलांना वाटत होते. पण रामचंद्रपंताच्या नेतृत्वामुळे ते शक्य होत नव्हते. रामचंद्रपंताने शंकराजी नारायण यांच्याकडे फौज देऊन मोगलांनी घेतलेले किल्ले, परत जिंकण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे शंकराजीने राजगड, तोरणा व रोहिडा हे जे किल्ले मोगलांनी १६९२ मध्ये जिंकलेले होते, ते इ.स. १६९३ मध्ये जिंकून परत घेतले. राजगड किल्ला जिंकण्या-च्यावेळी घोरपडीच्या साहयाने शंकराजी किल्यावर चढला होता. त्याच्या त्या पराक्रमाबद्दल "मदारूल महाम" हा किताब रामचंद्रपंताच्या शिफारसीनुसार त्याला मिळाला होता. संताजी व धनाजी यांच्या साहयानेही रामचंद्रपंतानी वाई काबीज करून तेथे आपले ठाणे बसविले होते. तसेच संताजी व धनाजीला चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्यासाठी प्रांतोप्रांती पाठविले होते. आणखी एक खास योजना आखण्यात आलेली होती. त्यानुसार एक नवी फौज तयार करून तिच्यावर पवार, थोरात व आटोळे, हे सरदार नेमले होते. त्यांच्या पराक्रमाबद्दल त्यांना अनुक्रमे "विश्वासराव", "दिनकरराव" व "समशेरबहादर" असे किताब देण्यात आले होते. अशा त-हेने रामचंद्रपंताने मोगलांच्या विरूद्ध लढण्यासाठी व स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी सर्वांना प्रेरणा देऊन, योग्य ते मार्गदर्शन करून आणि वेळ प्रसंगी कौतुक करून व त्यांना निरनिराळे किताब देऊन तथा संताजी घोरपडे यास १६९२ मध्ये जे वतन दिले होते,[६६] तशी वतने देऊन एक नवा जोम महाराष्ट्रात निर्माण केला होता. महाराष्ट्र शाबूत ठेवून मोगलांनी जिंजीला जाऊन राजा-रामाला पकडण्याचा जो डाव रचला होता, तो यशस्वी होऊ द्यावयाचा नाही,

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

६६. आपटे, द. वि., व ओतुरकर, र. वि., संपा. उपरोक्त., पृ. ६०-६१.

असे धोरण आखले होते. कोणत्याही प्रकारे बादशाहाची फौज जिंजीस पोहोचू द्यावयाची नाही, हे त्याने निश्चयपूर्वक ठरविले होते. म्हणूनच महाराष्ट्रातील प्रमुख किल्ले व भाग मोगलांच्याकडून हस्तगत केल्यावर, त्याने संताजी व धनाजी यांना जिंजीच्या रक्षणासाठी पाठविले होते. राजाराम महाराज, जिंजी येथे नोव्हेंबर १६८९ पासून ते १६९७[६७] पर्यंत होते. या दरम्यानच्या काळात रामचंद्रपंताने स्वराज्य रक्षणाची अत्यंत महत्त्वाची कामगिरी पार पाडली आणि औरंगजेबासारख्या धूर्त व सामर्थ्यशाली मोगल बादशाहाचे महाराष्ट्रात काही चालू दिले नाही. किंबहुना महाराष्ट्र जिंकून जिंजीला जाऊन राजारामाला पकडण्याचे औरंगजेबाचे स्वप्नही त्याने धुळीला मिळविले. रामचंद्रपंताच्या जीवनातील त्याच्या कर्तृत्ववाचा, हा काळ त्याला अलौकिक प्रतिष्ठा देणारा आहे. तसेच, मराठा राज्याच्या संरक्षणासाठी त्यांनी केलेले कार्य चिरंतनपणे महत्त्वाचे ठरविणारा आहे.

## २. राजारामाचा कबिला जिंजीस पोहचविला:

छत्रपती महाराष्ट्रात नसताना मोगलांच्या पासून महाराष्ट्राचे रक्षण करणे, ही अत्यंत कठीण गोष्ट होती. शिवाय मोगल बादशाहा, खुद्द औरंगजेबच मराठयांचे स्वराज्य नेस्तनाबूत करण्याच्या इराद्याने आपल्या सरदारांना आणि सैन्याला आदेश देत होता. या कठीण परिस्थितीला तोंड देत असतानाच रामचंद्र पंतावर, दुसरीही एक अत्यंत महत्त्वाची जबाबदारी होती. ती जबाबदारी म्हणजे छत्रपतीच्या कबिल्याचे म्हणजे बायका मुलांचे आणि नातेवाईकांचे संरक्षण करणे व त्यांना राजाराम महाराजांच्याकडे सुरक्षितपणे जिंजीला पोहोचविणे. ही कामगिरी तशी फार अवघड होती. पण त्याही कामगिरीत

---

६७. मराठेशाहीतील राजाराम., पृ. २८.

रामचंद्रपंत यशस्वी झालेले आहेत. एकीकडे मोगलांच्या उलट लढा चालू ठेवावयाचा होता व दुसरीकडे अत्यंत गुप्तपणे छत्रपतींच्या राण्यांना जिंजीपर्यंत नेवून पोहचवायचे होते. त्यांना तसे तिकडे पोहचविण्यासाठी दोन मार्ग होते. एक कोकणात जावून तेथून समुद्रमार्गाने पुढे जाणे व दुसरा कर्नाटकातून चोरट्या मार्गाने जिंजीपर्यंत जाणे.

राजाराम पन्हाळगडाहून रांगण्यास गेला व तेथून पुढे जिंजीला गेला.[६८] त्यावेळी राजारामाचा कबिला प्रथम पन्हाळगड येथेच होता. पुढे तो विशाळ-गडावर नेण्यात आला. विशाळगडावर असतानाच राजारामाची दोन नंबरची पत्नी ताराबाई, ही त्यावेळी साधारणपणे १४-१५ वर्षांची होती आणि तिला विशाळगडावर असतानाच १६९१ मध्ये शिवाजी नावाचा मुलगा झाला, असे मोडक[६९] यांनी म्हटलेले आहे. पण वा.सी. बेंद्रे यांच्या मतानुसार आणि पिर परिस्थितीला धरून हे खरे वाटते की ताराबाईला १६९१ मध्ये मुलगा झालेला नसून ९ जून १६९६ रोजी जिंजी येथे मुलगा झालेला आहे.[७०] गर्गे[७१] व सरदेसाई[७२] यांचेही मत असेच आहे. आणि विशाळगड येथे राजारामाला जो मुलगा झाल्याचे सांगण्यात येते, तो नाटकशाळेपासून झालेला राजा कर्ण हा असावा, असे दिसते.[७३] बेंद्रे यांनी या संदर्भात यादव दप्तरातील एक टिपण दिलेले आहे. त्यानुसार राजा कर्ण हा राजाराम महाराजांच्या नाटक शाखेचा मुलगा होता. तो राजाराम महाराजांना सर्वात वडील मुलगा होय. आणि झुल्फिकारखानाने राजाराम महाराजांचा पिच्छा चालवला असताना, त्यांचा मुलगा राजा कर्ण याला झुल्फिकारखानाच्याकडे गहाण ठेवला व पुढे ते जिंजीला गेले. त्यानंतर गिरजोजी यादवाने राजा कर्ण याची सुटका करून घेतलेली दिसते व त्यासाठी ४००० होन

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

६८. सरदेसाईराजाराम., पृ. २४.
६९. मोडक, वा.वृ., उपरोक्त., पृ. १५.
७०. अ) बेंद्रेराजाराम., पृ. २२३,
    ब) Brij, Kishore., op. cit., p. 26
७१) गर्गे,स.मा., उपरोक्त., पृ. ४४.
७२) सरदेसाईराजाराम., पृ. ५६
७३. बेंद्रेराजाराम., पृ. २२३.

मोगल फौजेतील कि-हाइकर वाणी यांना देऊन राजा कर्णाची सुटका केली व त्याला राजाराम महाराजाकडे जिंजीस पोहचते केले.[७४]

अशा एकूण परिस्थितीत रामचंद्रपंतानी विशाळगडावरचा कबिला जिंजीला पोहचविण्याचे इ.स. १६९४ च्या प्रारंभीच्या काळात महत्वाचे कार्य बजावले.[७५] राजारामाचा कबिला जिंजीला पोहचवण्याची व्यवस्था झाल्यावर, बादशहाच्या छावणीतून येसूबाईनी पत्राद्वारे कळवले होते की, "बायका मंडळी तिकडे घेऊन जावी. आमची सुटका कधी होईल ती होणे, परंतु तुम्ही वैताग करू नये. राज्यचिन्हादि चालवून पूर्व चालीप्रमाणे सर्व व्यवहार करून, बाया विशाळगडीं आहेत त्या घेऊन जाव्यात."[७६] त्यानुसार राजारामाने ही कामगिरी रामचंद्रपंतावर सोपविली. स्वाभाविकच पंताने सर्व खबरदारी घेऊन राजारामाच्या राण्या ताराबाई, [illegible], राजसबाई व अंबिकाबाई, आणि इतर मंडळी यांना समुद्रमार्गे जिंजीला पाठविण्याचा निर्णय घेतला होता. अर्थात राजाराम महाराजांना जिंजीला पाठविणे व त्यांच्या कबिला जिंजीस पाठविणे या दोन गोष्टी फार वेगवेगळ्या प्रकारच्या जबाबदारीच्या होत्या. कारण राजाराम महाराजांना चिटणीस बखरीत सांगितल्याप्रमाणे वेष बदलून कधी बैरागी तर कधी अन्य प्रकारचे वेषांतर[७७] करून जिंजीपर्यंत पोहचविता येणे जरी जबाबदारीचे होते, तरीही ते थोडे सुलभ होते. पण कबिला तसा पाठविता येणे शक्य नव्हते. त्यामध्ये केवळ स्त्रियाच होत्या असे नव्हे तर मुलेही होती. तर तो कबिला जलमार्गाने पोहचता करण्याचे निश्चित करुन प्रथम राजापूर, येथे खंडो बल्लाळ यांचे मामा लिंगो शंकर व विसाजी शंकर, हे होते तेथे आणण्यात आला. हे विसाजी व लिंगोजी सावकारी करीत होते व त्यांच्याकडे तारवे म्हणजे छोटी गलबते होती. त्या गलबतांच्याद्वारे

---

७४. उपरोक्त., पृ २१६.

७५. Brij, Kishore., op. cit., p. 26

७६. सगोसराजाराम., पृ. ५५.

७७. केरवाडकर, र.त्रि., उपरोक्तराजाराम., पृ. २२.

कबिल्याची रवानगी जिंजीकडे करण्यात आली. त्यांच्याबरोबर "खिसाजी प्रभृती गेले. यशवंतगडचे बंदरांत बसोन, मध्यें एके ठायी बंदर करून. उतरून, पुन्हा जहाजांत बसोन, चंदीप्रांतीं जहाज लावून चंदीस पोहोंचलीं. याजवरून महाराज त्यांजवर बहुत कृपावंत होऊन, त्यांची तारीफ करून, विश्वासू खरा, म्हणून जहाजांत बसलीं तो गांव ठिकाणों त्यांस इनाम देऊन, राजपत्रें करून दिल्हीं."[७८]

राजारामाचा कबिला जिंजीस कसा पाठविला यासंबंधी "बावडेकर पंत अमात्य हुकूमतपन्हा यांचे वंशावृत" या ग्रंथाचे लेखक रा.म. गोरे पुढीलप्रमाणे माहिती देतात--

"पुढें काही दिवसांनीं राजारामानें आपल्या कुटुंबाची मंडळी चंदीस पाठविण्याविषयी रामचंद्रपंतास लिहून विशाळगडास लोक पाठविले. रामचंद्रपंतानें खंडो बल्लाळ चिटणीस याचे आप्त राजापूर येथील खिसाजी शंकर सावकार यास विशाळगडी बोलावून आणिलें आणि त्याचे विश्वासूपणाची खात्री करून घेऊन त्यांचे जहाजांतून जलमार्गानें राजकुटुंबाची रवानगी चंदीस केली.; आणि ही बातमी कोणास कळूं नये याविषयी फार खबरदारी ठेविली. पुढें त्यास मंडळी सुखरूप पोंचल्याचें लिहून आलें."[७९]

"ताराबाई आणि तिचा काल" या अर्थाच्या इंग्रजी ग्रंथाचे कर्ते ब्रिज किशोर यानी सुध्दा रामचंद्रपंताने राजारामाचा कबिला जिंजीस कसा पोहचविला याचा वृत्तांत दिलेला आहे. राजारामाच्या तीन राण्या- ताराबाई, राजसबाई आणि अंबिकाबाई ह्या राजाराम जिंजीला गेल्यावर रामचंद्रपंताच्या संरक्षणात होत्या. त्या पंताच्या बरोबर विशाळगडावर राहात होत्या. त्या काळात त्यांचा ठावठिकाणा मोगल सरदारांना लागू नये व त्या मोगल सरदारांच्याकडून पकडल्या ~~जा~~

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

७८. उपरोक्त., पृ. २४-२५.
७९. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ. ४४.

जावू नयेत म्हणून रामचंद्रपंत त्यांच्या राहाण्याची ठिकाणे अत्यंत काळजीपूर्वक व गुप्तपणे सारखे बदलत होते. जेधे शकावलीमध्ये सांगितल्या-प्रमाणे १६९४ मध्ये आणि त्यापूर्वीसुद्धा या राण्यांना पकडण्यासाठी मोगलांनी अटोकाट प्रयत्न चालविले होते. पण केवळ रामचंद्रपंताच्यामुळेच त्यांचे संरक्षण झाले. आणि त्या वेंगुर्ला येथे बोटीत बसून समुद्रमार्गाने होनावर या पश्चिम किनाऱ्यावरील जिंजीजवळच्या बंदरात जावून पोहचल्या. तेथून बेदनूरच्या मार्गे खुष्कीच्या मार्गाने जिंजीस सुरक्षितपणे पोहचल्या. त्यांच्या बरोबर पंताने अत्यंत विश्वासू तथा वेळ प्रसंगी शौर्य गाजवून राण्यांचे संरक्षण करणारे कर्ते पुरुष म्हणून रामभट्ट पटवर्धन, गणोजी जेधे आणि लिंगो शंकर व विसाजी शंकर हे दोन प्रभू जमातीचे बंधू आणि काही निवडक संरक्षक दिलेले होते.[80] अशा तऱ्हेने रामचंद्रपंताने आपल्या-वरची छत्रपतीचा कबिला सांभाळण्याची व सुरक्षितपणे जिंजीला पोहाच-विण्याची अत्यंत महत्त्वाची कामगिरी यशस्वीपणे पार पाडली.

छत्रपती संभाजीराजे यांच्या वधानंतर राजाराम महाराजांचे संरक्षण करणे, त्यांच्या कबिल्याचे म्हणजे, राण्यांचे रक्षण करणे व मराठा राज्य सुरक्षित ठेवणे, अशी तीन कठीण तथा महत्त्वाची व अत्यंत जबाबदारीचे कामे पार पाडावयाची होती. रामचंद्र पंतांनी "हुकूमतपन्हा" म्हणजे सर्वाधिकारी या नात्याने ही तीनही अत्यंत जोखमीची कामे पार पाडली आहेत. खरे तर हा त्यांच्या व सर्वच मराठ्यांच्या कसोटीचा काळ होता. पण रामचंद्र पंत त्या कसोटीच्या काळातही समर्थपणे कर्तव्य बजावून यशस्वी झाले होते.

...

80. Brij.Kishore,,op.cit.,pp.47-48.